# प्रेस नोट

**धार्मीक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळा यांच्यासाठी पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना**

शासन निर्णय क्र. अविवि-२०१५/प्र.क्र.८०/१५/का-६, दि. ०७.१०.२०१५ अन्वये धार्मीक अल्पसंख्यांक विद्यार्थी बहुल शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळा यांच्याकडून शासनमान्य खाजगी शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळा यांच्यासाठी पायाभूत सोयी सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजने अंतर्गत कमाल रु. २.०० लाख अनुदानाचा लाभ घेण्यासाठी विहित नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहेत.

❖ **योजनेच्या अटी व शर्ती :**

- अल्पसंख्यांक समाजाचे (मुस्लिम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शिख व पारशी) किमान ७०% विद्यार्थी शिकत असणे आवश्यक आहे.
- शासन मान्यताप्राप्त अपंगांच्या शाळांमध्ये किमान ५०% अल्पसंख्यांक विद्यार्थी शिकत असणे आवश्यक आहे.
- कनिष्ठ महाविद्यालय व औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या अभ्यासक्रमांच्या समकक्ष दर्जा देण्यात आलेले अभ्यासक्रम चालविणाऱ्या शाळा व व्यावसायिक शिक्षण संस्था तसेच स्वंय-अर्थसहाय्यित शाळा या योजनेंतर्गत अनुदानासाठी पात्र असणार नाहीत.
- यापूर्वी या योजनेंतर्गत ०५ वेळा अनुदान प्राप्त केलेल्या शाळा/संस्था अनुदानासाठी पात्र ठरणार नाहीत.
- महानगरपालिका व जिल्हा परिषदा या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिपत्याखाली चालविण्यात येत असलेल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालये व अपंग शाळा या योजनेसाठी पात्र असणार नाहीत.
- सदरील योजनेसाठी शासन निर्णय क्र. अविवि-२०१५/प्र.क्र.८०/१५/का-६, दि. ०७.१०.२०१५ मधील सर्व अटी व शर्ती लागु राहतील.
- तसेच शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणारे निर्देशांचे पालन करणे बंधनकारक राहतील.

❖ **सदर योजने अंतर्गत खालील पायाभूत सुविधांसाठी अनुदान देय आहे.**

१) शाळेच्या इमारतीचे नुतनीकरण व डागडुजी
२) ग्रंथालय अद्ययावत करणे
३) संगणक कक्ष उभारणे/अद्ययावत करणे
४) शैक्षणिक कार्यासाठी आवश्यक फर्निचर
५) इन्व्हर्टरची सुविधा निर्माण करणे (मुंबई शहर व उपनगरे वगळून)
६) अध्ययनाची साधने (Learning Material)/एल.सी.डी. प्रोजेक्टर, अध्ययनासाठी लागणारे विविध सॉफ्टवेअर, इत्यादी
७) इंग्रजी लँग्वेज लॅब
८) शुध्द पेयजलाची व्यवस्था करणे.
९) प्रयोगशाळा उभारणे/अद्ययावत करणे
१०) प्रसाधनगृह/स्वच्छतागृह उभारणे/डागडुजी
११) झेरॉक्स मशीन
१२) संगणक हार्डवेअर/सॉफ्टवेअर

- **इच्छुक शाळा, कनिष्ठ महाविद्यालय, औद्योगिक प्रशिक्षण संस्था व अपंग शाळांनी परिपुर्ण भरलेला अर्ज अल्पसंख्यांक विकास विभाग, जिल्हा नियोजन समिती, जिल्हाधिकारी कार्यालय येथे दि. १८.०९.२०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वाजे पर्यंत सादर करावा.**
- **प्रत्येक शैक्षणिक संस्थेने DIES CODE, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेने Institute Code तसेच अपंग शाळांनी लायसन्स नंबर देणे आवश्यक आहे.**
- **विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले प्रस्ताव ग्राह्य धरले जाणार नाहीत.**
- **शासन निर्णय व अर्जाचा नमुना http://mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.**

**मा. जिल्हाधिकारी,**
**हिंगोली**

Scanned by CamScanner